# 'टीम अण्णा'चा ब्लॉग घोटाळा



नवी दिल्ली, दि. ५ (वृत्तसंस्था) - 'टीम अण्णा'ला सदस्यांच्या घोटाळेबाजीचे लागलेले ग्रहण सुटेनासे झालेले असतानाच आता दस्तुरखुद्द अण्णा हजारे यांच्या 'ब्लॉग'नेही मोठाच घोटाळा घडवला आहे. टीमला सुरुंग लावणारा मजकूर अण्णांच्याच हस्ताक्षरात ब्लॉगवर झळकल्याने अण्णांना जबर हादरा बसला. यापुढे ब्लॉग नव्याने लिहिण्यासाठी दोन पगारी नोकर नेमण्याचा निर्णय त्यांनी आज घेतला. टीम अण्णाविरुद्ध कटकारस्थाने रचली जात असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला.

अण्णा हजारे यांनी आपले विचार तत्परतेने जनमानसात पोहोचवण्यासाठी 'ब्लॉग' सुरू केला होता. त्याचे शब्दांकन राजू परुळेकर हे करत असत. मात्र त्या ब्लॉगवर झळकलेल्या अण्णांच्याच हस्ताक्षरातील एका पत्राने त्यांचा रक्तदाब चांगलाच वाढवला. 'अरविंद केजरीवाल, किरण बेदी, मनीष सिसोदिया आणि प्रशांत भूषण यांचा अण्णांना पुरता उबग आलाय' असे त्यात म्हटले आहे. हे पत्र अण्णांनीच २३ ऑक्टोबरला आपल्या हाती दिले होते असे राजू परुळेकर यांनी ब्लॉगवर नमूद केले आहे. अण्णांचे स्वीय सहाय्यक सुरेश पठारे यांनी ते पत्र ब्लॉगवर टाकण्यास विरोध केला होता, असेही परुळेकर यांचे म्हणणे आहे.

## हस्ताक्षर नव्हे, स्वाक्षरी खरी माना!

मनात आलेले विचार कागदावर उतरवण्याची माझी सवय आहे, पण माझ्या हस्ताक्षरावर नव्हे, तर स्वाक्षरीवर विश्वास ठेवा. टीम अण्णाच्या कोर कमिटीत बदल करण्याचे माझ्या मनात होते, पण तसे काही केले नाही. माझ्याविरुद्ध कोणीतरी बदनामीचे षड्यंत्रच रचले आहे. माझा ब्लॉग लिहिण्याची जबाबदारी सोपवलेल्या राजू परुळेकर यांनी तर माझा साफ विश्वासघातच केला आहे.



- ब्लॉगवर टाकलेल्या पत्रातही अण्णांची स्वाक्षरी आहे, परंतु आधीच्या पत्रांमध्ये असलेली अण्णांची स्वाक्षरी आणि पत्रात केलेली स्वाक्षरी वेगळी आहे.
- अण्णांनी २ नोव्हेंबरला पंतप्रधानांना पत्र लिहिले होते. त्या पत्रातील स्वाक्षरी पूर्णपणे वेगळी आहे. आज ब्लॉगवर टाकण्यात आलेल्या पत्रात फक्त नावच लिहिले आहे. एवढेच नव्हे तर, ब्लॉगवरील आधीच्या पोस्टमध्ये टाकलेल्या पत्रांमध्ये अण्णांची स्वाक्षरीच नाही.
- अनेक पत्रांमध्ये अण्णा कि. बा. हजारे अशी स्वाक्षरी करतात. वादग्रस्त ब्लॉग पोस्टवरील पत्रात फक्त अण्णा हजारे एवढेच लिहिलेले आहे.